# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांकः २/एनजीसी/माहिती पुस्तिका/२००८/ २४८८

दिनांक : 19 DEC 2008

विषयः व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वेबसाईटवर ऑनलाईन
पध्दतीने संस्थांनी माहिती अपडेट करण्याबाबत..

उपरोक्त विषयाबावत या संचालनालयाच्या अधिपत्याखाली सुरु असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांना कळविण्यात येते की, शै.व. २००९-१० मधील प्रवेशाकरीता या संचालनालयामार्फत माहिती पुस्तिका प्रकाशित करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदर माहितीपुस्तिकेसाठी संस्थेची माहिती (उदाः फोन नंबर, फॅक्स नंबर, इ-मेलचा पत्ता, वेबसाईट, हॉस्टेलची माहिती इत्यादी) **ऑनलाईन पध्दतीने या संचालनालाच्या संकेतस्थळावर दि. २६/१२/०८पर्यंत** अद्ययावत करावी. **ज्या संस्थांच्या माहितीमध्ये बदल असेल त्यांनी २२६९०००७ या नंबरवर फॅक्स करावा.** तसेच ज्या संस्थांना ३० जून नंतर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी मिळालेली असेल किंवा प्रवेशक्षमता बदल करण्यास परवानगी मिळालेली असेल व सदर बदल या संचालनालयाच्या संकेतस्थळावर दर्शविलेला नसेल तर सदर बदलाच्या नोंदीसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे मान्यतापत्र तसेच शासन निर्णय इत्यादी कागदपत्रे घेऊन खास दुतामार्फत दि. ३१/१२/०८ पर्यत या संचालनालयास सादर करावीत.

याबाबत पुढे असेही कळविण्यांत येते की, ज्या संस्था विहित मुदतीत माहिती अद्ययावत करणार नाहीत व त्यामुळे माहिती पुस्तिकेमध्ये सदर बदलाची नोंद झाली नाही तर यासाठी सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. व्ही.एम.मोहितकर )
उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

जा.क्र. विकापु/विवि/मा.पु./१०९३५ 23 DEC 2008

या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांच्या माहीती व पुढील कार्यवाही साठी.

सहसंचालक,
तंत्र शिक्षण (प्रशासन)
विभागीय कार्यालय, पुणे-१६

\\dtens1\Desk2\Mayekar 08\Institute letter.doc

प्रत - श्री. शिंदे, प्रोग्रामर, यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक कार्यालयाच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रसिद्ध करावे.